http://www.loksatta.com/daily/20030708/mum01.htm

# गुजरातमध्ये पाय न ठेवण्याची झहिराची प्रतिज्ञा

मुंबई, ७ जुलै / प्रतिनिधी : गुजरातमधील असुरक्षित वातावरणातून जीव वाचवून मुंबईत आलेल्या झहिराने पुन्हा तेथे जाणार नाही अशी प्रतिज्ञा केली आहे. जेथे कायद्याचे नव्हे तर केवळ जातीयवादी गुंडांचे राज्य आहे तेथे जाऊन मी माझा जीव धोक्यात का घालू, असा सवाल तिने विचारला आहे. 'बेस्ट' बेकरी जळितकांडाचा खटला गुजरातबाहेर पुन्हा सुरू करावा अशी मागणीही तिने केली आहे.

'बेस्ट बेकरी' या वडोदऱ्यातील बेकरीच्या मालकास त्याच्या कुटुंबियांसह १ मार्च २००२ रोजी धर्मांध गुंडांनी चारी बाजूने घेरून जिवंत जाळले होते. यातून झहिरा, तिची आई शेरुन्निसा, तिचे दोन भाऊ एवढेच वाचले होते. या घटनेच्या दुसऱ्या दिवशी हल्लेखोरांची नावे सांगणाऱ्या झहिराने न्यायालयात आपली साक्ष बदलून हल्लेखोरांना ओळखण्यास नकार दिला होता. आपल्यावर दबाव आल्यामुळेच आपण असे केले हे सांगणाऱ्या झहिराने आज मुंबईत आपली कैफियत प्रसार माध्यमांपुढे मांडली.

'सिटिझन्स फॉर जस्टिस अ‍ॅण्ड पीस' (सीजेपी) या संघटनेच्या कार्यकर्त्यांसमवेत झहिरा आणि तिचे कुटुंबीय मुंबईत आले आहे. त्यांच्या जीविताला धोका असल्यामुळे त्यांच्या निवासाबाबत संपूर्ण गोपनीयता बाळगण्यात येत आहे. यावेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी झहिराला वारंवार १ मार्चला नेमके काय झाले याबाबत आणि न्यायालयात जबानी बदलल्यानंतर ती कोणाबरोबर गेली यावरच छेडण्याचा प्रयत्न केला. प्रसार माध्यमे झहिराची मानसिकता समजून घेत नाहीत, अशी तक्रार यावेळी सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी आणि लेखक-कवी जावेद अख्तर यांनी केली.

गुजरातमधील न्याययंत्रणा पूर्णपणे भाजपाला विकली गेली असल्याचा आरोप करून झहिरा म्हणाली, तेथे आजही भीतीचे वातावरण आहे. आम्हाला सांभाळून घेण्याचे आणि संरक्षण देण्याचे नाटक करणाऱ्या शेजारच्यांचे खरे स्वरूप १ मार्चला मी पाहिले आहे. मला न्याय मिळावा म्हणून मी गुजरातमधील वकिलांकडे गेले. माझी बाजू न्यायालयात मांडण्याची त्यांना विनंती केली पण प्रत्येकाने माझ्याकडे पैसे मागितले. एकाने तर चार लाख रुपये मागितले. माझ्या नातेवाईकांनीही घाबरून मला साथ करण्यास नकार दिला. आमच्या मुस्लिमांच्या संघटनेनेही मला मदत करण्यास नकार दिला. अशा असुरक्षित वातावरणात मी कशी राहणार. गेल्या दीड महिन्यात मी, माझी आई आणि माझ्या भावाने प्रत्येकी एक तास जबानी दिली. पण आम्हाला सरकारी वकिलानेही प्रश्न विचारला नाही. आमची जबानी संपताच आम्हाला एका गाडीतून परत पाठविण्यात आले, असे ती म्हणाली. ही गाडी कोणाची होती असे विचारता ती मधुकर श्रीवास्तव याची होती असे तिने सांगितले. या गाडीत ती स्वत: बसली की तिला कोणी जबरदस्ती केली, असाही प्रश्न तिला विचारण्यात आला तेव्हा आपल्या भावानेच आपल्याला त्या गाडीत बसण्यास सांगितल्याचे ती म्हणाली. यावेळी हस्तक्षेप करीत जावेद अख्तर म्हणाले की, न्यायालयातील जबानी बदलण्यासाठी ज्यांनी दबाव आणला त्यांनी तिच्या भावावर दबाव आणला नसेल कशावरून. गुजरातमध्ये झालेल्या न्यायालयीन प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याची तिची मागणी लक्षात घेऊन प्रसार माध्यमांनी तिचे म्हणणे मांडावे.

गुजरातमध्ये गोध्रा-कांडानंतर उसळलेल्या दंगलीतील अनेक आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली असून हे सर्वजण राजरोस फिरत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध तक्रार करणाऱ्यांचे जीवन असुरक्षित झाले असल्याचे या फोरमच्या कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांनी सांगितले.